# PKC's STEM-RewirED उपक्रम
## यासाठी शाळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत

शिका, रूपांतर करा, प्रगती करा

STEM-RewirED
Teach | Transform | Thrive

## STEM-RewirED उपक्रमा बद्दल माहिती

**पुणे नॉलेज क्लस्टर (पीकेसी)** ह्या संस्थेमार्फत **"STEM -रिवायर्ड"** ह्या एका केंद्रित, स्पर्धात्मक आणि गरज-आधारित उपक्रमाचे वर्ष **२०२५-२०२६** साठी आयोजन करण्यात येत आहे. ह्या उपक्रमा अंतर्गत शासकीय आणि अनुदानित शाळांमधील शिक्षकांना २१व्या शतकातील आवश्यक कौशल्ये आणि तंत्रज्ञान-सक्षम साधने प्रदान करून, प्रभावी STEM शिक्षण देण्यासाठी सक्षम बनवण्याचा उद्देश आहे. हा उपक्रम शैक्षणिक गुणवत्ता आणि सुसंगतता निर्माण करण्यासाठी **शिक्षकांना** सशक्त करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे जेणे करून विद्यार्थ्यांसाठी STEM शिक्षण अधिक परिणामकारक, व्यावहारिक आणि प्रेरणादायक ठरेल.

**STEM-रिवायर्ड** हा गरज असलेल्या भागांतील शिक्षणात परिवर्तन घडवण्यासाठी डिझाइन केलेला उपक्रम आहे. या उपक्रमामार्फत डिजिटल दरी कमी करणे, विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल प्रज्वलित करणे आणि शिक्षणात परिणामकारकता निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे**.** या उपक्रमामध्ये १० पेक्षा अधिक प्रमुख शैक्षणिक संस्था आणि शैक्षणिक फाउंडेशनचा सहभाग आहे. त्यांच्या कौशल्यांचा वापर करून वैज्ञानिक पद्धतीने रचना (डिझाइन) व संयोजित केलेली STEM शिक्षण साधने जी दैनंदिन वर्गात थेट वापरता येतील तसेच अध्यापन व शिक्षण अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी मदत करतील.

## STEM-RewirED उपक्रमाची वैशिष्ट्य:

१. **शाळेसाठी डिजिटल टूलकिट मिळवा** – सहभागी शाळांना विनामूल्य तंत्रज्ञान-सक्षम अध्यापन साधनांनी सज्ज डिजिटल साहित्य-संच प्रदान केला जाईल.

२. **वर्षभर शिक्षक प्रशिक्षण** – प्रत्येक शाळेतील २-३ शिक्षकांना STEM, डिझाईन थिंकिंग आणि गेम-आधारित अध्यापनात प्रशिक्षण देण्यात येईल.

३. **कार्यशाळा व बूटकॅम्प** – तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्रांमध्ये सहभागी होता येईल.

४. **गेम डेव्हलपमेंट** – राष्ट्रीय STEM संग्रहासाठी गेम design करण्यामध्ये सहभाग होता येईल.

५. **EduConclave 3.0 मध्ये सादरीकरण** – PKC च्या वार्षिक शिक्षण परिषदेत तुमच्या शाळेची नाविन्यपूर्ण अध्यापन साधने सादर करता येईल.

## लक्षात ठेवण्याच्या तारखा:

**नोंदणी सुरू होण्याची तारीख – २१ जुलै २०२५**

**नोंदणीची अंतिम तारीख – ५ ऑगस्ट २०२५**

## पात्रता निकष

- मर्यादित/डिजिटल पायाभूत सुविधा नसलेल्या शाळांना प्राधान्य (संगणक प्रयोगशाळा, स्मार्ट टीव्ही, प्रोजेक्टर, स्मार्ट बोर्ड किंवा टॅब्लेट नसलेल्या).
- **ह्या उपक्रमासाठी चा रेजिस्ट्रेशन फॉर्म शाळेच्या मुख्याध्यापकांनी भरावा. ह्या उपक्रमासाठी मुख्याधायपाकाने २-३ शिक्षक ( जे ५ ते १०वी च्या विद्यार्थ्यांना शिकवतात) नॉमिनेट करावे.**

**कृपया लक्षात घ्या:**
ह्या उपक्रमात एकूण ५ कार्यशाळा घेतल्या जातील. ज्यात २ प्रत्यक्ष (In-person) आणि ३ ऑनलाइन कार्यशाळाआयोजित केले जातील. सर्व प्रशिक्षण मोफत दिले जाईल आणि प्रत्यक्ष रित्या होणाऱ्या कार्यशाळेसाठी लागणार खर्च शाळेने करणे अपेक्षित आहे. ह्यातील एक कार्यशाळा तुमच्या जवळच्या गावात आणि एक पुण्यात होईल.

## अर्ज कोणी करावा?

**२५-२६ आर्थिक वर्षासाठी फक्त पुणे ग्रामीण आणि कोकण विभागातील शाळा पात्र आहेत.**

- सरकारी शाळा
- शासकीय अनुदानित शाळा
- आश्रमशाळा/आदिवासी शाळा

**नोंदणीसाठी स्कॅन करा**

**अर्ज करण्यासाठी QR कोड स्कॅन करा!**

**नोंदणीसाठी लिंकवर क्लिक करा-**
**bit.ly/pkcsSTEAMRewirED Program**

**आमच्याशी संपर्कात राहा**